**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी – वेळ सायंकाळी ६.००)**

**बुधवार, दिनांक : ०४ ऑक्टोबर, २०२३**

**ठळक बातम्या**

- केंद्र सरकारतर्फे प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरच्या अनुदानात शंभर रुपयांनी वाढ
- नागपुरातील आदिवासी उपोषणकर्त्यांचे साखळी उपोषण आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या भेटीनंतर
- मागं; सुराबर्डीत गोंडवाना आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय होणार असल्याची गावित यांची घोषणा.
- राज्यातील ११ जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची सुधारित यादी जाहीर; विदर्भात ६ जिल्ह्यांना मिळाले नवे पालकमंत्री.

  आणि
- आशियाई क्रीडा स्पर्धेत तीरंदाजीमध्ये नागपूरचा ओजस देवतळे आणि ज्योती वेन्नम या जोडीला सुवर्णपदक; आशियाई क्रीडा स्पर्धेत एकूण ७४ पदकांसह भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी.

केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय

केंद्र सरकारने उज्ज्वला प्रधानमंत्री योजनेच्या लाभार्थ्यांसाठी स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरचे अनुदान शंभर रुपयांनी वाढवले आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत एका महत्त्वाच्या निर्णयात गॅस सिलेंडरच्या अनुदानात वाढ करण्यास मंजुरी मिळाली असून, ते सध्याच्या 200 रुपये प्रति सिलेंडरवरून 300 रुपये प्रति सिलेंडर केले आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुरागसिंह ठाकूर यांनी आज नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली.

केंद्रीय मंत्रिमंडळाने तेलंगणा आणि आंध्र प्रदेश यांच्यातील निर्णयासाठी आंतरराज्य नदी जल विवाद कायदा, 1956 अंतर्गत कृष्णा जल विवाद न्यायाधिकरण-II च्या संदर्भातील अटी मंजूर केल्या आहेत. या वादाच्या निराकरणामुळे दोन्ही राज्यांमध्ये विकासाचे नवीन मार्ग खुले होतील, असेही ठाकूर यांनी सांगितले.

रिझर्व बँक

रिझर्व बँकेच्या वित्त आणि पतधोरण आढावा समितीची बैठक आज मुंबईत सुरू झाली. या वर्षीचा द्वैवार्षिक वित्त आणि पत धोरण आढावा रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास येत्या शुक्रवारी सकाळी १० वाजता जाहीर करतील, आणि नंतर पत्रकारपरिषद घेतील. गेल्या आढाव्यात व्याजदरांमधे कोणताही बदल रिझर्व बँकेनं केला नव्हता. सध्या रेपो दर साडेसहा टक्के तर रिव्हर्स रेपो दर तीन पूर्णांक ३५ शतांश टक्के आहे तसंच बँक दर पावणेसात टक्के आहे. चालू आर्थिक वर्षासाठी जीडीपी वाढीचा दर साडेसहा टक्के राहील, असा अंदाज रिझर्व बँकेने आतापर्यंत व्यक्त केला आहे.

नाना पटोले

राज्यात स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे ३२ लाख विद्यार्थी आहेत. राज्य सरकारच्या विविध विभागातील नोकर भरतीसह एमपीएससीकडून केल्या जाणाऱ्या भरती प्रक्रिया वादग्रस्त आणि विद्यार्थ्यांवर अन्याय करणाऱ्या ठरत आहेत. राज्य शासनाला या प्रश्नी वारंवार सांगूनही त्यामध्ये काही सुधारणा होत नसल्याने राज्यपालांनी यात हस्तक्षेप करून या विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवाव्यात, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

पटोले यांनी विद्यार्थी प्रतिनिधींसह राजभवनवर राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेऊन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसंदर्भात येणाऱ्या विविध अडचणी तसेच कंत्राटी नोकर भरती विरोधात निवेदन दिले.

शासकीय पदभरतीचे कंत्राटीकरण त्वरित रद्द करावे आणि या संबंधीचा 6 सप्टेंबर 2023 चा शासन निर्णय मागे घ्यावा, असे या निवेदनात म्हटले आहे.

डॉ.विजयकुमार गावित

आदिवासींचे हक्क आणि विकासासाठी राज्य शासन सदैव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून आदिवासींच्या आरक्षणामधून अन्य कुणालाही आरक्षण देण्यात येणार नाही, नागपुरातील सुराबर्डी येथे गोंडवाना आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय उभारण्यात येणार, गडचिरोली येथील आदिवासी आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्यासाठी गृह विभागाला विनंती करणार, शासकीय वसतिगृहात भोजनावळ पूर्ववत सुरू होणार, शबरी आवास योजनेतून आदिवासींना जास्तीत-जास्त घरकुले बांधून देणार, अशी ग्वाही आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांनी नागपूरमध्ये आदिवासी साखळी उपोषणकर्त्यांना दिली.

नागपूरच्या संविधान चौक येथे संयुक्त आदिवासी कृति समितीच्या वतीने २५ सप्टेंबर २०२३ पासून सुरू असलेल्या साखळी उपोषणाला डॉ. गावित यांनी आज भेट दिली आणि उपोषणकर्त्यांच्या मागण्यांसंदर्भात चर्चा केली. आदिवासींच्या आरक्षणातून कोणालाही आरक्षण देण्यात येणार नाही आणि तशी शिफारसही केंद्र शासनाला करण्याची शासनाची भूमिका आहे असं ते म्हणाले. आदिवासी विकास विभागाच्या वतीने मंजूर आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय तथा प्रशिक्षण केंद्राची स्थापना नागपुरातील अमरावती रोडस्थित सुराबर्डी येथेच होणार असून येत्या हिवाळी अधिवेशन काळात या संग्रहालयाचे भूमिपूजन करण्यात येणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

पालक मंत्री

राज्यातल्या ११ जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची सुधारित यादी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज जाहीर केली. सुधारित यादीनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे जिल्ह्याचं पालकमंत्री पद देण्यात आलं आहे. विदर्भातील 6 जिल्ह्यांना पालकमंत्री पद नव्याने मिळाले आहे. त्यानुसार अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे- पाटील असतील. अमरावती जिल्ह्याचं पालकमंत्री पद चंद्रकांत पाटील यांच्याकडे सोपवण्यात आलं आहे. धर्मराव बाबा आत्राम यांच्याकडे गोंदिया जिल्ह्याची जबाबदारी आली आहे. भंडाऱ्याचे पालकमंत्री डॉ. विजयकुमार गावित,

तर बुलढाण्याचे पालकमंत्री  दिलीप वळसे-पाटील असतील.  सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे वर्धा जिल्हा पालकमंत्री पद देण्यात आलं आहे.

वाघनखं

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत महत्वाची भूमिका असलेल्या गनिमी काव्याचं उत्तम उदाहरण असलेली वाघनखं ब्रिटनमधून भारतात आणण्यासंबंधीचा सामंजस्य करार लंडन येथे करण्यात आला. शिवछत्रपतींची ही वाघनखं आता केवळ महाराष्ट्रच नव्हे तर भारतातील तमाम शिवप्रेमींसाठी एक प्रकारे शिवदर्शन ठरणार आहे, असे प्रतिपादन यावेळी दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.
व्हिक्टोरिया अँड अलबर्ट म्युझियमचे संचालक ट्रायस्टम हंट यांच्यासोबत वाघनखं भारतात आणण्याच्या करारावर यावेळी स्वाक्षरी करण्यात आली. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, उद्योग मंत्री उदय सामंत, सांस्कृतिक विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, संचालक पुरातत्व आणि संग्रहालय तेजस गर्गे हे यावेळी उपस्थित होते.
ही वाघनखं नोव्हेंबर 2023 ते नोव्हेंबर 2026 या तीन वर्षांच्या कालावधीकरिता भारतात राहतील. ही वाघनखं महाराष्ट्रातील विविध संग्रहालयात शिवप्रेमी, इतिहासप्रेमी नागरिकांना पाहण्यासाठी ठेवण्यात येतील. यात सातारा, नागपूर, कोल्हापूर येथील राज्य पुरातत्व विभागाच्या संग्रहालयांसह मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचा समावेश राहणार आहे.

निरी स्थापना दिवस

वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद- सीएसआयआरच्या अंतर्गत नागपूरच्या वर्धा रोड स्थित राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन  संस्था- निरीच्या 82 व्या स्थापना दिनानिमित्त एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित आयआयटी मुंबईचे अधिष्ठाता डॉ.  रवींद्र गुडी यांनी याप्रसंगी औद्योगिक आस्थापनांमध्ये शाश्वत उपक्रम यासंदर्भात एक सादरीकरण केलं. याप्रसंगी त्यांनी हरित रसायन शास्त्राविषयी

सविस्तर माहिती देत हरित अभियांत्रिकीच्या उत्पादन संरचनेमधील महत्त्व देखील अधोरेखित केलं.

प्रास्ताविक करताना निरीचे संचालक डॉ. अतुल वैद्य यांनी निरीद्वारे राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी नीरीमध्ये दीर्घकाळ सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार तसेच पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

निरीच्या 82 व्या स्थापना दिवसाच्या निमित्ताने निरीच्या वतीने विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून यामध्ये वैज्ञानिक विद्यार्थी संवाद, विज्ञानाच्या प्रारूपांचं प्रदर्शन त्याचप्रमाणे सीएसआर निरीतर्फे राबविण्यात जाणाऱ्या संशोधन आणि विकासाची माहिती यांचा समावेश आहे.

गांधी जयंती

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो, क्षेत्रिय कार्यालय नागपूर आणि हिंगणा रोडस्थित प्रियदर्शनी लोकमान्य टिळक इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रियदर्शनी महाविद्यालय येथे महात्मा गांधी जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा, सोशल मीडिया कॅम्पेन कॉन्टेक्स्ट, प्रश्न मंजुषा प्रतियोगितेचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धा आणि प्रश्न मंजुषा स्पर्धेत मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाला केंद्रीय संचार ब्युरो, क्षेत्रिय कार्यालयाचे क्षेत्रिय प्रचार अधिकारी सौरभ खेकडे, जेष्ठ पत्रकार आनंद निरवान, जिल्हा परिषद नागपूरचे दिनेश मासोदकर, प्रियदर्शनी लोकमान्य टिळक इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च संस्था MBA आणि BBA चे विभाग प्रमुख कार्तिक उत्तरवार प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

गांजा कार्यवाही

यवतमाळच्या महागाव तालुक्यात शेतकऱ्यांनी तब्बल वीस एकरात गांजा लागवड केल्याचा प्रकार पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने उघडकीस आणला आहे. घोनसरा, बर्गेवाडी येथील शेतशिवारात सहा वेगवेगळ्या शेतांमध्ये इतर पिकांच्या

आड गांजाची मोठ्या प्रमाणात झाडे लागली असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. आंतरपीक पद्धतीने लागवड केलेल्या या गांजाचे मूल्य २५ ते ३० लाख रुपयांच्या घरात असून १५ क्विंटलहून अधिक गांजाची झाडे जप्त करण्यात आली. यवतमाळ पोलिसांनी प्रथमच गांजा लागवडीची इतकी मोठी कारवाई केली असून चौघांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. यवतमाळचे पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी घटनास्थळी पोहोचून कारवाईबाबत पोलिसांना सूचना दिल्या.

आशियाई क्रीडा

आशियाई क्रीडा स्पर्धेत तीरंदाजीमध्ये मिश्र दुहेरी प्रकारात नागपूरचा ओजस देवतळे आणि ज्योती वेन्नम या जोडीनं सुवर्णपदक पटकावलं. 16 सुवर्ण, 27 रौप्य आणि 31 कांस्य अशा एकूण 74 पदकांसह भारत सध्या एकूण पदकतालिकेत चौथ्या स्थानावर असून ही भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चमकदार कामगिरी करणाऱ्या सर्व भारतीय खेळाडूंचे अभिनंदन केलं आहे. याशिवाय आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं आतापर्यंत नेहमीच सर्वोत्तम कामगिरी केली असून देशातल्या प्रतिभासंपन्न आणि मेहनती खेळाडूंच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ‘ऐतिहासिक क्षण’ भारताला अनुभवायला मिळत आहेत, अशा शब्दात क्रीडामंत्री अनुरागसिंग ठाकूर यांनी स्पर्धेतल्या यशस्वी खेळाडूंचं कौतुक केलं आहे. यंदाच्या स्पर्धेतले आणखी पाच दिवस बाकी असून भारतीय खेळाडू देदीप्यमान कामगिरी करतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. यंदाच्या 19 व्या आशियाई क्रीडा स्पर्धेचा समारोप येत्या रविवारी होणार आहे.

The End